सकाळ

# बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उद्या नेत्रतपासणी

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २१ : के. के. वाघ शिक्षण संस्था, के. के. वाघ फाऊंडेशन, (कै.) बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन, स्माईल व स्पिनॅच यांच्यातर्फे बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतीप्रित्यर्थ निफाड तालुक्यात मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. काकासाहेबनगर, भाऊसाहेबनगर, पिंपळस, चांदोरी आणि व-हेदारणा येथे पार पडणार आहे.

पहिल्या टप्प्यात काकासाहेबनगर येथे नेत्र तपासणी शिबीर आयोजित केले गेले आहे. त्यानुसार सावरगाव, कुंभारी, रानवड, वावी व सारोळे(खु) या गावातील नागरिकांसाठी रविवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेदरम्यान के के वाघ इंग्लिश स्कूल, काकासाहेबनगर येथे होणार आहे. तरी नागरीकांनी नेत्र तपासणीसाठी आधार कार्ड घेऊन येणे अनिवार्य आहे. तसेच नाव नोंदणीसाठी संदिप शिंदे (९०२११९१९४६७) व ज्ञानेश्वर गवळी (९३५६७९७८९९) यांच्याशी संपर्क साधावा. शिबीराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालक मंडळ, अजिंक्य वाघ व सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी केले आहे.

Nashik, Nashik-Today
22/02/2025 Page No. 3